Frequently Asked Questions in Marathi & English:

१) छत्रपती संभाजीनगर महापालिकेचे सप्त तारांकित स्मार्ट नागरिक धोरण म्हणजे काय?
उत्तर:
माननीय आयुक्त आणि प्रशासक, छ. संभाजीनगर महानगरपालिका, श्री जी. श्रीकांत (IAS) ह्यांनी भारतात प्रथमच, 7 स्टार स्मार्ट सिटिझन नावाचा एक अनोखा कार्यक्रम तयार केला आहे. प्रशासनाच्या प्रक्रियेत नागरिकांना सामील करून घेण्याची वेळ आली आहे आणि त्यांना चांगल्या नागरी पद्धती जोपासून निरोगी, शाश्वत, पर्यावरणपूरक आणि प्रामाणिक जीवनशैली अंगीकारण्यासाठी प्रेरित करण्यासाठी छत्रपती संभाजीनगर महापालिकेने खालील क्षेत्रे ओळखली आहेत ज्यामध्ये नागरिक त्यांचा "स्मार्टनेस" प्रदर्शित करू शकतात आणि प्रत्येक क्षेत्रात प्रत्येकी १ स्टार मिळवू शकतात -

१) हरीत तारा - तुमच्या मालमत्तेत जमिनीवर / अंगणात / छतावर / गच्चीवर/ बाल्कनीत वृक्षारोपण केले आहे का?

२) स्वच्छता तारा - तुमच्या मालमत्तेतील ओल्या व सुक्या कचऱ्याचे विलगीकरण करण्यात येते का?

३) जल शक्ती तारा - तुमच्या मालमत्तेत पावसाचे पाणी मुरवण्याची प्रणाली (रेन वॉटर हार्वेस्टिंग) कार्यान्वित आहे का?

४) ऊर्जा तारा - तुमच्या मालमत्तेत सौर ऊर्जा प्रकल्प ऑन ग्रीड किंवा ऑफ ग्रीड कार्यान्वित आहेत का?

५) वायू तारा - तुमच्या कुटुंबात ई-वाहन वापरतात का? नसल्यास आपण सार्वजनिक वाहतुकीचा वापर करीत आहात का?

६) नारी शक्ती तारा - तुमच्या मालमत्तेचा मालकी हक्क कोणा महिलेच्या नावावर आहे का? अथवा कोणी महिला सह मालक आहे का?

७) डिजिटल तारा - आपण मालमत्ता कर भरणा आणि पाणीपट्टी भरणा वेळेवर आणि online करता का?

1) What is seven-star smart citizen concept of Chhatrapati Sambhajinagar Municipal Corporation?
Answer:
Hon'ble Commissioner and Administrator, Ch. Sambhajinagar Municipal Corporation, Shri G. Sreekanth (IAS) has created a unique program called 7 Star Smart Citizen, first time in India. It is time to involve citizens in the process of governance and to inspire them to adopt healthy, sustainable, eco-friendly and honest lifestyles by cultivating good civic practices, Chhatrapati Sambhajinagar Municipal Corporation has identified the following areas in which citizens can demonstrate their "smartness" and earn 1 star each in each area. -

1) Green Star – Have you planted trees on the ground / roof / terrace / balcony of your property?

2) Clean Star - Is the segregation of wet and dry waste is being done in your property?

3) Jal Shakti Star – Do your property have a rainwater harvesting system in place?

4) Energy Star – Do your property have solar power plants operating on-grid or off-grid?

5) Smart Transport Star - Does your family use e-vehicles? If not, are you using public transport?
6) Women Empowerment Star - Is your property owned by a woman? Or is there a female co-owner?
7) Digital India Star - Do you pay property tax and water bill on time and online?

२) छत्रपती संभाजीनगर महापालिकेच्या सप्त तारांकित धोरणाकरिता नाव नोंदणी करण्यासाठी मला काय करावे लागेल?
उत्तर:
छत्रपती संभाजीनगर महापालिकेच्या वेबसाईट वर उपलब्ध असलेला अर्ज स्मार्ट नागरिक भरू शकतील आणि प्रस्तुत (सबमिट) करू शकतील. अर्ज करण्याकरिता मालमत्ता क्रमांक प्रविष्ट करणे अनिवार्य आहे.
दिलेल्या ७ प्रश्नांची उत्तरे देऊन प्रत्येक प्रश्नाच्या सकारात्मक उत्तरासाठी (पुराव्या सहित) प्रत्येकी १ स्टार मिळवू शकतील.
अर्ज प्रस्तुत (सबमिट) झाल्यानंतर छत्रपती संभाजीनगर महापालिकेकडून स्मार्ट नागरिकांना त्यांच्या मोबाईल क्रमांकावर एक पुष्टीकरण संदेश प्राप्त होईल.

2) What do I have to do to register my name for seven-star concept of Chhatrapati Sambhajinagar Municipal Corporation?
Answer:
Smart citizens can fill and submit the application form available on Chhatrapati Sambhajinagar Municipal Corporation website. Entering property number is mandatory for applying.
Answering the given 7 questions will earn 1 star each for a positive answer (with proof) to each question.
Smart citizens will receive a confirmation message from Chhatrapati Sambhajinagar Municipal Corporation on their mobile number after the application is submitted.

३) ताऱ्यांचे गुणांकन कसे केले जाते?
उत्तर:
७ क्षेत्रातले ७ प्रश्न छत्रपती संभाजीनगर महापालिकेने दिलेले आहेत. प्रत्येक प्रश्नाच्या सकारात्मक उत्तरासाठी (पुराव्या सहित) प्रत्येकी १ स्टार मिळेल.

नागरिकांनी अर्ज स्वरूपात भरलेल्या माहितीची तपासणी झोन कार्यालय मार्फत १५ दिवसात प्रत्यक्ष करण्यात येईल आणि त्या प्रमाणे अंतिम गुणांकन निश्चित करण्यात येईल.

3) How are the stars scored?
Answer:
7 questions in 7 categories have been given by Chhatrapati Sambhajinagar Municipal Corporation. Each question will get 1 star for a positive answer (with proof).

The information filled in the application form by the citizens will be checked physically by the zone office within 15 days and the final stars will be determined accordingly.

४) छत्रपती संभाजी नगरच्या नागरिकांना ह्याचा कसा फायदा होईल?
उत्तर:
प्राप्त तारांकित गुणांकन आधारे महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ताधारकांना मालमत्ता कराच्या सामान्य करात सूट देण्यात येणार आहे. पाच तारांकित गुणांकन प्राप्त करणाऱ्या नागरिकांना ६%, सहा तारांकित गुणांकन प्राप्त करणाऱ्या नागरिकांना ८% व सात तारांकित गुणांकन प्राप्त करणाऱ्या नागरिकांना १०% सूट सामान्य करात मिळेल. सूट मिळवण्याकरिता नागरिकांना कमीत कमी पाच तारांकित गुणांकन प्राप्त करणे अनिवार्य आहे.

4) How will this benefit the citizens of Chhatrapati Sambhaji Nagar?
Answer:
Based on the star rating obtained, the property owners in the municipal area will be provided with a discount on the general tax of the applicable property tax. Citizens with five-star rating will get 6% discount, six-star rating will get 8% and seven-star rating will get 10% discount on general tax. Citizens are required to obtain at least a five-star rating to avail the discount.

५) संबंधित कागदपत्रे मी कशी जमा करू शकेन?
उत्तर:
जेंव्हा नागरिक छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या वेबसाईट वरील ७ स्टार स्मार्ट नागरिक चा अर्ज भरतील, तिथे प्रत्येक प्रश्नाच्या शेवटी फोटो व कागदपत्रे संलग्न करण्याची सुविधा उपलब्ध करून दिलेली आहे तिथून नागरिक संबंधित कागदपत्रे जमा करू शकतील.

5) How can I submit the relevant documents?

Answer:

While filling up the 7 Star Smart Citizen application form on the website of Chhatrapati Sambhajinagar Municipal Corporation, at the end of each question, there is a facility to attach photos and documents from where the citizen can submit the relevant documents.